**विशेष लेख क्र.२५**
**१ मे-जागतिक कामगार दिन**

५ वैशाख १९३० शके (सायं. ५.३० वा.)
शुक्रवार, दि. २५ एप्रिल २००८

# *व्यर्थ न हो बलिदान*

**कामगार हा औद्योगिक क्षेत्राच्या विकासातील मूलभूत घटक आहे. यासाठी त्याचे जीवनमान सुधारणे गरजेचं आहे. १ मे हा दिवस जगभरात 'जागतिक कामगार दिन' म्हणून साजरा केला जातो. कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी कामगार व त्यांच्या संघटनांनी संघटित होणं गरजेचं आहे. त्यामुळे कामगार आणि औद्योगिक क्षेत्र यांच्यात सामंजस्य निर्माण होऊन त्यांचा विकास साधणे सुकर होईल. कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देऊन आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या कामगारांच्या स्मृतीला उजाळा देणारा हा लेख ...**

महाराष्ट्रातच नव्हे तर, साऱ्या विश्वात १ मे हा दिवस 'जागतिक कामगार दिन' म्हणून साजरा केला जातो. प्रतिवर्षी येणाऱ्या पारंपरिक उत्सवाप्रमाणेच कामगार दिन देखील जणू एक सण बनला आहे. जगभरात १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून का पाळला जातो, या मागे देखील एक इतिहास आहे. अमेरिकेतील शिकागो येथे कामगारांनी आपल्या कामाचा कालावधी आठ तासाचा करावा, या मागणीच्या पुर्ततेसाठी १ मे १८८६ रोजी विराट मोर्चा काढला. परंतु अमेरिकन सरकारच्या पोलिसांनी हा मोर्चा बेकायदेशीर ठरवून तेथील कामगारांवर बेछूट गोळीबार केला आणि या घटनेत तेथील असंख्य कामगार धारातिर्थी पडले. या हुतात्म्य पत्करलेल्या कामगारांच्या बलिदानाचे पुण्यस्मरण जगातील सर्व कामगारांना व्हावे, या उद्देशाने हा दिवस **जागतिक कामगार दिन** म्हणून पाळला जातो.

कामगार दिनानिमित्त तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले की, "महाराष्ट्र राज्य हे श्रमिकांचे, कष्टकरींचे राज्य आहे. घाम गाळून, प्रामाणिकपणे काबाडकष्ट करुन आपली उपजिविका भागविणारी समृद्ध कामगार संस्कृती आपल्या राज्याला लाभली आहे. स्वाभिमान हा येथील कामगारांचा स्थायीभाव आहे. तर 'मोडेल पण वाकणार नाही' अशा भावना यशवंतरावांनी या हुतात्म्यांच्या महान कार्याचा गौरव करताना व्यक्त केल्या. कामगार हा औद्योगिक क्षेत्राचा पाठीचा कणा आहे, यासाठी त्यांचे प्रश्न सुटणे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने गरजेचं आहे," हा विचारही त्यांनी या दिनानिमित्त कामगारांपुढे मांडला.

कामगारांनो ! आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघटित व्हा ! असे आवाहन या दिनी कामगारांना केले जाते. या दिनाचे औचित्य साधून कामगार संघटना विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम, सभा, चर्चासत्रे आयोजित करुन कामगारांना संघटित होण्याचा संदेश देत असतात. कामगार चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगारांनी व त्यांच्या संघटनांनी संघटित होऊन आपल्या न्याय्य मागण्यांसाठी लढा दिला पाहिजे, जेणेकरुन कामगारांना न्याय मिळून त्यांना स्वाभिमानानं जगणं सूकर होईल. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने, गिरणीमालकांना 'आधी कामगारांचे पुनर्वसन व नंतर जमीन विक्री' अशी कायदेशीर अट घातली आहे. इतकेच नव्हे तर, असंघटित कामगारांच्या हितासाठी देखील शासनाने कायदा केला आहे. कामगारांचा सर्वांगिण विकास साधणे, हे शासनाचे धोरण आहे. शासनाच्या या कार्याला हातभार लावण्यासाठी कामगार संघटनांनी स्वयंस्फुर्तीने पुढे येणे आवश्यक आहे. असं केल्याने कामगारांचा रोटी-कपडा-मकान तसेच पाल्यांचे शिक्षण यासारखे जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लागण्यास हातभार लागेल.

कामगार संघटना व त्यांच्या नेत्यांनी विधायक मार्गाने रचनात्मक कार्यक्रम आखून कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी शर्थीचे प्रयत्न करावेत. कामगारांच्या सर्वांगिण विकासासाठी शासन आवश्यक ते सर्व सहकार्य करील. कामगारांचे जीवन सुसह्य व समृद्ध झाले म्हणजे जागतिक कामगार दिन साजरा करणे खऱ्याअर्थाने सार्थक ठरेल.

**रणवीर रजपूत**
वरिष्ठ सहाय्यक संचालक, मंत्रालय

०००

चव्हाण/महाले/२३ एप्रिल /बागुल/२५.४